सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
**शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय,**
**अवसरी (खुर्द), ता. आंबेगाव, जि. पुणे - ४१२४०५.**

दुरध्वनी क्रं. (०२१३३) २३०५८२ E-mail : gcoeara@gmail.com Web-Site : www.gcoeara.ac.in

जा.क्र.शाअवसंमअ/विवि/२०२२/6423 दिनांक : 19/11/2022

# -: विद्यार्थ्यांसाठी महत्वाची सुचना :-

**संदर्भ-** सा.फु.पुणे विद्यापिठ यांचे दि. १८/११/२०२२ रोजीचे परिक्षा अर्ज भरण्याबाबत प्रदर्शीत झालेले वेळापत्रक

महाविद्यालयातील चालू शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये प्रथम वर्षात प्रवेशित असलेल्या सर्व विद्यार्थ्यांना सुचित करण्यात येते की, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापिठाकडून शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील ऑक्टोबर/नोव्हेंबर २०२२ या प्रथम सत्रातील परीक्षा अर्ज भरून घेणे सुरू झाले आहे. **अंतिम मुदत दिनांक ३०/११/२०२२** ही देण्यात आलेली आहे. सर्व विद्यार्थ्यांना सुचित करण्यात येते की, परीक्षा अर्ज भरण्यापुर्वी **Digilocker** या संकेतस्थळावर जावून **Register** करून **ABC (Academic Bank Credit) Number** मिळवावा व परीक्षा अर्ज भरतांना परीक्षा अर्जात सदर Number नमुद करावा. तसेच विद्यार्थ्यानी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापिठ यांचे संकेतस्थळावर (www.unipune.ac.in) जावून ऑनलाईन पध्दतीने परीक्षा अर्ज भरण्यापुर्वी ,संबंधित विभागातील शिक्षकाकडून आपल्याला कोणते विषय आहेत. तसेच कोणते ऑडीट कोर्स /Special /Elective/Honours इत्यादी विषय लागू आहेत, याबाबत प्रथमत: चौकशी करावी. त्यांनतर ऑनलाईन परीक्षा अर्ज काळजीपुर्वक भरून परीक्षा अर्ज योग्य पदधतीने भरल्याची खात्री करावी. मगच परीक्षा अर्जाची प्रिंट आउट काढून परीक्षा अर्जावर नमुद असलेले परीक्षा शुल्क **SBI Collect** वर ऑनलाईन पध्दतीने भरून शुल्क भरलेली पावतीची प्रिंट तसेच मागील वर्षाच्या सर्व गुणपत्रिका व Admission Confirmation परीक्षा अर्जासोबत जोडून, विद्यार्थ्यानी परीक्षा अर्जात नमुद केलेला (TH/OR/PR/Audit Course/Elective/Honours subject) बरोबर असल्याची संबंधित विभागातील नेमुन दिलेल्या शिक्षकाकडून खातरजमा करावी व त्यावर संबंधित शिक्षकाची स्वाक्षरी घ्यावी. त्यानंतर कार्यालयातील विद्यार्थी विभागात स्वत: जावून परीक्षा अर्जाची पडताळणी केल्यानंतर रोखपालकडून पेमेंट रिसीप्ट चेक करून सदर अर्ज डि.पी.यू. विभागात जमा करणे आवश्यक आहे.

विद्यार्थ्यांनी विद्यापिठाकडून दिलेल्या मुदतीपुर्वी **(दि. ३०/११/२०२२)** परीक्षा अर्ज भरून व त्याची प्रिंट आउट काढून विद्यार्थी विभागातून पडताळणी करून व रोखपाल यांच्याकडून चेक करून डि.पी.यू. विभागात जमा न केल्यामुळे भविष्यात होणा-या शैक्षणिक व आर्थिक नुकसानीस विद्यार्थी स्वत: जबाबदार असेल, याची सर्व विद्यार्थ्यानी गांभिर्याने नोंद घ्यावी.

19-11-22
(डॉ. दि. रा. पानगव्हाणे)
प्राचार्य,
शासकिय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय,
अवसरी खुर्द ता. आंबेगाव जि.पुणे.

प्रत- माहीती व आवश्यक कार्यवाहीसाठी.

१.विभागप्रमुख-अनुविद्युत/उपकरणीकरण/संगणक/स्वयंचल/स्थापत्य/यंत्र/उपयोजित वि./कर्मशाळा त्यांनी ही सुचना व सोबतचे परिपत्रक आपल्या विभागातील विद्यार्थ्यांच्या What,s App ग्रुप वर त्वरीत पाठवावी.

२. डि. पी. यु. विभाग यांनी सदर सूचना सर्व विभागप्रमुखांना मेल करावी.

३. श्री. एस. ए. थोरात सहाय्यक प्राध्यापक संगणक- यांनी सदर सुचना संस्थेच्या संकेतस्थळावर वरीत प्रदर्शित करावी.